# धनी : एक अवलोकन




संपादक

प्रा. डॉ. तुळशीराम [illegible] [illegible]



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

१४. कृषी व ग्रामीण जीवनानुभवाचे वास्तव चित्रण : 'धनी' ७३
*प्रा. डॉ. राजशेखर नळगे*

१५. कृषी जीवनाच्या उत्कट अविष्कार : 'धनी' ८३
*प्रा. दीपक सूर्यवंशी*

१६. 'धनी'तील भाषिक सामर्थ्य ८८
*प्रा. अरविंद हंगरगेकर*

१७. 'धनी' काव्यसंग्रहातील परिवर्तनवादी स्त्री ९७
*प्रा. अविनाश ताटे*

१८. 'धनी' सामाजिक बांधिलकीचा लेखाजोखा १०३
*प्रा. [illegible] दांगट*

१९. 'धनी' काळ्या मातीची वेदना-संवेदना जपणारी कविता ११७
*श्री. [illegible]कुमार जावळे*

२०. 'धनी' विविधांगी दर्शन १२३
*डॉ. लक्ष्मण सोळुंके*

२१. 'धनी' मधील सामाजिकता १३१
*प्रा. हनुमंत सौदागर*

२२. 'धनी' मधील पाऊस आणि शेतकरी १४८
*प्रा. डॉ. सूर्यकांत गित्ते*

२३. 'धनी' काव्य संग्रहातील वास्तव १५३
*प्रा. संदीपान हजारे*

२४. ग्रामसंस्कृतीचे वास्तवदर्शी चित्रण : 'धनी' १५८
*प्रा. कृष्णा तेरकर*

२५. 'धनी' काव्य संग्रहातील निसर्ग आणि बळीराजा १६२
*प्रा. डॉ. सोपान सुरवसे*

२६. ग्रामजीवनाचा धगधगता आविष्कार 'धनी' १६८
*प्रा. डॉ. अमजद अत्तार*

२७. 'धनी' काव्य संग्रहातील ग्रामीण जीवन १७२
*डॉ. अनंत वडघणे*


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

# १४. कृषी व ग्रामीण जीवनानुभवाचे वास्तव चित्रण : 'धनी'

प्रा. डॉ. राजशेखर नळगे
संशोधन मार्गदर्शक व मराठी विभाग
जवाहर महाविद्यालय, अणदूर,
ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

देठावर फुल उमलावं तशी कविता कवीच्या आंतरीक आत्म्याहून अलगद अवतरत असते. या प्रक्रियेच्या खोल तळाशी अप्रकट मनाचं अखंड चिंतन असतं. चिंतनातून स्फुरणाला बहर येतो. हा बहर गळणारा असतो आणि तरीही तो सुंदर असतो. जसं फुल उमलतं, कोमेजून देठातून गळतं तरीही परागरुपानं ते झाडाचं असतं. फुलाचं मातीत मिळणं ही एक दृष्य घटना आहे. सुगंध मात्र अदृष्य असतो. या अदृष्यतेशी कवितेची नाळ जोडलेली असते.

अदृश्याला मुर्तरुप देण्यासाठी कवी अहोरात्र साधनेत राहतो. मी-तू पणाचं, चराचराचं, आजुबाजूच्या जनजीवनाचं, अस्तित्वाचं चिंतन कळत-नकळत करत असतो. किंबहूना एका तंद्रीतून हे चिंतन घडतं. कवी निमित्त मात्र असतो. यातूनच रुपक फुलतात, प्रतिमा उमलतात, कोवळ्या लुसलुसत्या शब्दांचा लालस-पोपटी रंग सांकेतिक विधानांना येतो. कवी भावार्थात पुरा हरवतो. तेंव्हा कुठं एक आधारीत संगती मुर्त होते, जाणिवेत येते आणि कवितेचा जन्म होतो.

हे सारं खरं असलं तरी सगळे कवी निर्मितीच्या प्रक्रियेविषयी सजग असतातच असं नाही. अबोध पातळीवरुन मनाचा व्यवहार काहींना महत्त्वाचा वाटत नाही. काहींच्या तो जाणिवेत येत नाही. तर काही कवी कवितेच्या जन्मोत्तर लौकिक गोष्टीमध्येच बुडून जातात. खरे तर अनुभव ते कवितानुभव हा भावप्रवास प्रचारकी थाटात नसतो. तो असतो कवीच्या नुसत्या माणूसपणात. यासाठीच माणूसपणाची स्पष्टता कविमनाला व्हावी लागते. तेंव्हा कुठं कवितेतला भाव वाचकांच्या मनात उतरतो आणि निर्मितीची प्रक्रिया स्वाभाविकपणे पूर्ण होते.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

 ISBN : 978-81-909123-4-1

हे सांगण्याचे तात्पर्य एवढेच की डॉ. भारत हंडीबाग यांच्या कवीमनाला ही माणूसपणाचा स्पर्श झालेला आहे. त्यांच्या 'धनी' या काव्यसंग्रहातील कविता या भूमिकेतूनच अविष्कृत झालेल्या आहेत. हे त्या कवितांचा आस्वाद घेतल्यानंतर निश्चितच जाणवल्या शिवाय राहत नाही. कवी डॉ. भारत हंडीबाग यांच्या कवितांचा परिघ हा ग्रामीण व कृषी प्रधान जन-जीवन आहे. कवीचा जन्मच खेड्यातील शेतकरी कुटूंबात झालेला असल्यामुळे तेथे लहानाचा मोठा होत असताना कवीनं जवळून पाहिलेले जीवन, अनेक उन्हाळे-पावसाळे पाहिल्याचा अनुभव, शेतकरी, शेतमजूर, खेड्यातील माणसं, स्त्रीया, घर, समाजव्यवस्था, रुढी-परंपरा, गावगाड्यात कष्ट करणाऱ्या माणसांच जीवन, सुख-दुःख, त्यांच्या जीवनातील चढ-उतार आणि या सगळ्या प्रसंगाला खंबीरपणे तोंड देत जगणारा माणूस त्यांच्या कवितेचा विषय आहे. खेड्यातला माणूस कितीही दुःखी असला तरी तो माणूसकी सोडून कधीच वागत नाही. हे ही कवीच्या मनाला भावल्याचे दिसून येते.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेती व पशुपालन हे भारतीयांचे प्रमुख उद्योग आहेत. शेतीवरच भारतीयांचे जीवनमान अवलंबून आहे. तरीही आजपर्यंत शेतकऱ्याच्या कष्टाला न्याय मिळाला नाही. त्यांनी उत्पादीत केलेल्या धान्याला योग्य भाव मिळाला नाही. म्हणून आजही शेतकरी, शेतमजुर, कष्टकऱ्यांच्या मुलभूत गरजाही पूर्ण झालेल्या नाहीत. शेतकरी कुटूंबच शेतामध्ये अहोरात्र कष्ट करत असते. तरीही निसर्गाची साथ नसल्याने, सावकारी पाशात अडकल्याने, मालाला भाव न मिळाल्याने शेतकरी सतत आर्थिक अडचणीत सापडलेला दिसतो. तरीही तो हार न मानता हे ही दिवस कधीतरी जातील या आशेवर जगत असतो. पण देशाला स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे झाली. तरीही शेतकऱ्यांचे हे हालाखीचे दिवस अजून गेलेच नाहीत. कधी जातील सांगता येत नाही ही वास्तव परिस्थिती कवीने आपल्या कवितेच्या माध्यमातून समाजासमोर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आजही ग्रामीण भागात एकत्र कुटुंब पद्धतीला महत्त्व आहे. आई-वडील, आजी-आजोबा, काका-काकी, भाऊ-बहिण, मुले-नातवंडे असा मोठा परीवार एका

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur. Dist. Osmanabad

घरात आनंदाने एकत्र राहतात, त्यातच त्यांना आनंद वाटत असतो. गावातील लोकही त्यांच्याकडे 'एक आदर्श कुटुंब' म्हणून पाहत असतो. याचं प्रतिनिधीत्व करणारी डॉ. भारत हंडीबाग यांची 'धनी' ही कविता आहे. एकत्र कुटुंबामध्ये खेड्यात आई-वडील, मोठा भाऊ-भावजय काबाड कष्ट करुन लहान भावाला, दिराला शिकवतात. शिक्षण देतात कारण आमच्या वाट्याला आलेलं कष्ट त्यांच्या वाट्याला येऊ नये. त्यांनी भरपूर शिक्षण घ्यावं. सरकारी नोकरी करावी आणि आपल्या घरातील दारिद्रय नष्ट व्हावं. त्यांच्या जीवनात सुख यावं अशी त्यामागची भावना असते. ते शिकवतात आणि आनंदी जीवन जगतात. हे बघून त्यांना आनंद होतो. बायको नवऱ्याला म्हणते. दादासाब अन् जाऊबाई आनंदाने आणि प्रेमाने राहत आहेत हे पाहून ती म्हणते,

**"माझं हुरदं भरुन येतं**
**हिरीतल्या मोटावानी"**

**(धनी)**

एक कुटूंब उभा केलेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येतो. तर दुसरीकडे आपणही त्यांच्यासारखं जगावं असं तिला वाटते. नवऱ्यानं आपणालाही बैलगाडीत बसवून घेवून जावं, फिरवून आणावं पण तीही अपेक्षा पूर्ण होत नाही. कारण नवऱ्याचा जीव शेतावर, जनावरावर जास्त असतो. तो सतत शेतात राबत असतो. म्हणून ती म्हणते,

**"माझा जीव तुमचेवर**
**अन् तुमचा राना बैलावर"**

**(धनी)**

माझा तुमच्यावर कितीही जीव असला तरी सासूबाईंनी सावत्र मुलगा म्हणून तुम्हाला शिकवल नाही. त्यामुळे तुम्हाला हे दिवस आलेत. जर तुम्हालाही चांगले सुखाचे जीवन जगायचे असेल, त्यांच्यासारखं व्हायचे असेल तर ती म्हणते,

**"तुमाला त्येंच्यासारखं व्हायचं असलं तर**
**तुमीबी रात्रीच्या शाळेला जाऊन लई शिका**
**अन् सावित्रीला फुलेनी जसं शिकवलं तसं मलाबी शिकवा."**



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

 ISBN : 978-81-909123-4-1

मंजी त्यांच्यासारखीच आपलीबी जाईल जिनगानी"

(धनी)

म्हणजे सुखाने जीवन जगायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षण हे सुखाचे दार आहे, हे ही यातून सुचित करण्याचा प्रयत्न कवीने केला आहे. कारण सर्वसाधारण सुखाची अपेक्षा शिक्षणाच्या माध्यमातून पुर्ण होईल असे कवीला वाटते.

स्त्री आणि पुरुष हे समाजाचे दोन चाक आहेत. समाज गतिमान राहण्यासाठी समाजात जन्माला आलेल्या स्त्री-पुरुषांनी लग्न केले पाहिजे, दोन-तीन वर्षात मुल झालं पाहिजे, अन्यथा अपत्यहीन कुटूंबाकडे विशेषतः स्त्रीकडे समाज वेगळ्या नजरेने बघतो. तिला शुभ कार्यात न बोलावता वाळीत टाकतो. म्हणून 'ऐकलंत का?' या कवितेतील स्त्री लग्नाला दहा वर्षे झाली. सर्व प्रयत्न करुनही मुल होत नाही म्हणून आपल्या पतीला म्हणते,

**"टेस्ट ट्युब बेबीनं**
**माझी कुस उजवा"**

आणि माझ्या माथी आलेला वांझपणा घालवून टाका. तेही होत नसेल तर,

**"फुले सावित्रीनं जसा**
**यशवंत दत्तक घेतला**
**तसं एखादं अनाथ पोर दत्तक घ्या"**

आणि ते ही जमत नसेल तर पुढे जाऊन ती म्हणते,

**"सारी इस्टेट गावच्या शाळेला दान द्या"**

**(ऐकलंत का?)**

काय करायचे आहे ते करा. पण लवकर निर्णय घ्या आणि माझ्या कपाळी लागलेला डाग पुसून टाका.

'धनी' काव्य संग्रहातील स्त्रीया या सहनशील, उदारमतवादी, पुरोगामी विचाराच्या, बदलते जीवनमान स्वीकारणाऱ्या, पण परंपरेशी नातं जोडून ठेवणाऱ्या आहेत. धनी, ऐकलंत का?, आवं सखुचे बाबा, धनी दुर का हो आता, कारभारी इ.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

कविता यांचे उत्तम उदाहरण आहेत. या स्त्रीया काबाडकष्ट करणाऱ्या, दु:खाला समर्थपणे सामोरे जाणाऱ्या, वाट्याला आलेले भोग भोगताना 'जातील हेबी दिस' म्हणत पुढे वाटचाल करणाऱ्या, आपल्या मनातील भाव-भावनांना, सुख-दु:खांना मोकळेपणाने वाट करुन देणाऱ्या आहेत. म्हणजेच 'धनी' या काव्य संग्रहातील स्त्रीया या आपल्या पतीशी एकतर्फी संवाद करताना दिसतात. पण त्या निराशावादी नसून आशावादी आहेत. आज ना उद्या आपल्याही जीवनात निश्चित सुख येईल म्हणून त्या धडपडताना दिसतात.

'धनी' या काव्यसंग्रहातील काही कवितामधून कवीने ग्रामीण भागातील, अशिक्षित, कष्ट करणारी, पण नवविचारांचा अंगीकार करणारी, संकटावर मात करुन सुखाकडे झेप घेऊ पाहणारी आशावादी स्त्री रेखाटली आहे. शेती, पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी, रोगराई, निसर्गाचा असमतोल आणि अचानकपणे अंगावर कोसळणारी अनेक संकटे, याच्या जाळयात अडकलेले शेतकऱ्यांचे चित्रणही कवीने 'धनी' या काव्यसंग्रहातील काही कवितामधुन केले आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, कधी रोगराई तर कधी सावकाराचे पाश यामध्ये शेतकरी कसा भरडला जातो. याचे वास्तव चित्रण कवीने कालचा पाऊस, पावसा तुझ्या येण्यासाठी, बरसणारे ढग, बळीराजा, गेल्या साली रानामंदी, पाऊस, आली सुगी फुगले गाल, बाप, मुके जीव इत्यादी अनेक कवितांमधून केले आहे. आतून-बाहेरुन कोलमडून पडलेला शेतकरी काही वेळा अंधश्रध्देला बळी पडतो. यामुळे या संकटातून सुटका होईल अशी खोटी आशा त्याला असते. उसने अवसान आणून जगण्याला धीर देण्याचा तो प्रयत्न करत असतो. कारण वास्तव वेगळे आहे हे त्याला कळून चुकलेले असते. म्हणून 'बळीराजा' या कवितेत तो म्हणतो,

**"नावालाच मी बळीराजा नुसताच उरलो**
**साऱ्या आयुष्यात मी मातीसाठी झुरलो"**

एवढे करुनही आज मी फाटका फकीर झालो आहे. माझ्या पदरी काहीच पडलं नाही, असं तो हताश होऊन म्हणताना दिसतो. काबाडकष्ट करुन काही वेळेला शेतात माल पिकवतो. पण तेही पद्रात पडत नाही. कारण शेत पिकल्याचे कळताच,

**"सरकारी अन् खाजगी जमले सारे सावकार**



Principal
Jawahar Arts, Science & Commerce ...
Anadur, Tal. Tuljapur, Dist. O...

 ISBN : 978-81-909123-4-1

म्हणती त्याला सारे जन
इकडे वळव तुझा माल"

(आली सुगी फुगले गाल)

शेतकऱ्याने कितीही विनवणी केली तरी सावकार त्याचे ऐकत नाही. तो माल घेऊन जातो आणि घरात आजारी पडलेल्या म्हातारीला दवाखान्यात न्यायलाही पैसे नसतात. त्यामुळे शेवटी ती म्हातारी मरुन पडते. एवढेच नाही तर माणसाप्रमाणे दुष्काळामुळे जनावरेही मरतात. हे सांगताना कवी म्हणतो,

"आली सुगी फुगले गाल
गेली सुगी मागचे हाल
बैल बांधले धुऱ्यावर
चाऱ्यासाठी मरमर
दोन करडू एक शेळी
पाला पाला म्हणत मेली
गाय हुंगते भुस्कट
पोट गेलं पाटीला
वासरु आन् रेडकू
हंबरत हंबरत मेलं काल"

(आली सुगी फुगले गाल)

यातून कवीने माणसांप्रमाणे जनावरांचेही कसे हाल झाले त्याचे हुबेहुब चित्रण केले आहे. 'गेल्या साली रानामंदी' या कवितेतही असेच वर्णन आले आहे. रोगराईची साथ येते आणि माणसाप्रमाणे जनावरांनाही घेरते. यात माणसाबरोबर जनावरंही मरतात. याचे वर्णन करताना कवी म्हणतो,

"आता गोठ्यात बैलगाय, खोडतात जागी पाय
झोपडीत दोन लाल, रडतात धाय धाय
आज घरात माझ्या, एक थोरली लेक
पिकू दे लई शेत, माझी अब्रु झाक



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

चंदा तरी बाबा, नको करु अनमान
जीव झाला बेजार, तुला कुंकवाची आन"

गेल्या वर्षासारखं यावर्षी करु नको, म्हणून ती स्त्री त्याला आपल्या कुंकवाची आन घालते. कारण शेत पिकलं तरच आमची अब्रु झाकली जाते. आम्ही मातीसाठीच जगतो आणि मातीसाठीच मरतो. तुझ्याच आशेवर आमचं जगणं असतं अशी ती अंत:करणापासून सांगत असते. शेतकऱ्यांच्या वस्तुस्थितीचे हुबेहुब वर्णन कवीने आपल्या कवितेतून अत्यंत संवेदनशीलतेने केले आहे. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे 'बाप' आणि 'बळीराजा' होय.

"मातीसाठी माझा बाप, बैलावानी राबला
त्याला जगाची चिंता, त्यानं बघितलं आभाळ
बाप मातीत जगला, अन् मातीत इरला"

(बाप)

"नावाला मी बळीराजा नुसताच उरलो
साऱ्या आयुष्यात मी मातीसाठी झुरलो
मी गां फाटका फकीर माझ्या धोतराला गाठी
माझ्या लेकराला खाया नाही नाचणीची रोटी
मी मातीचा नावालाच का धनी?"

(बळीराजा)

आज मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दिसून येते. ती तात्कालिक घटना नसून त्याची पार्श्वभूमी अनेक वर्षापासून तयार झालेली असते, हे डॉ. भारत हंडीबाग यांच्या मराठवाड्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जीवनावर लिहिलेल्या कवितांमधून दिसून येते. शेतकरी कर्ज झाले म्हणून एकाएकी आत्महत्या करत नसून वर्षानुवर्षे अहोरात्र शेतात राबून सुद्धा कर्ज फिटत नाही. कुटूंबातील लोकांचे उदरनिर्वाह करु शकत नाही. मुलांचे शिक्षण करु शकत नाही ना मुलीचे लग्न करु शकत नाही. म्हणजेच आयुष्यात एकही दिवस सुखाने जगू शकत नाही आणि कुटूंबाला जगवू शकत नाही, असे जेंव्हा शेवटी वाटते तेंव्हा तो अंतिम



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

 ISBN : 978-81-909123-4-1

निर्णयाला येताना दिसतो. ती वेळ येऊ नये म्हणून त्या अगोदरच शेतकऱ्यांसाठी समाजाला, सरकारला काही करता आले तर बरे. म्हणून कवीने या शेतकऱ्यांच्या जीवनाचे वास्तव चित्र या कवितांच्या माध्यमातून समाजासमोर, सरकारसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. समाजाला, सरकारला या माध्यमातून आपल्यापरीने जागं करण्याचा प्रयत्न केला आहे असे मला वाटते.

या देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे झाली तरी या देशातील अजूनही मुलभूत प्रश्न सुटलेले नाहीत. तरी या देशातील नेतेमंडळी भारत महासत्ता बनायचे स्वप्न पाहत आहेत. ग्रामीण भागातील लोकांचे, शेतकरी, शेतमजुर यांचे प्रश्न जाणून घेऊन ते सोडवण्याचा प्रयत्न करणारे नेतं आज कुठे दिसत नाहीत. म्हणून कवी 'बापू' या कवितेत म्हणतात,

**'पुज्य बापू तुम्ही खरोखरच देश वाचविला**
**पण आधुनिक बापूनी तुम्ही वाचवलेला देश नासविला'**

म्हणून आज जनतेनेच गांभीर्याने विचार करुन सर्वसामान्याबद्दल कळवळा असणारा, सामान्यांच्या प्रश्नांची जाण असणारा आणि ते सोडविण्यासाठी मनापासून धडपडणारा कोणता नेता आहे, हे पाहूनच त्यालाच निवडून दिले पाहिजे. नाही तर या देशाचं काय होईल सांगता येत नाही.

या बरोबरच काही शृंगारीक कविताही कवीने लिहिल्या आहेत. अहोरात्र कष्ट करणाऱ्यांची प्रेमभावनाही कवीच्या नजरेतून सुटलेली नाही. प्रेम ही नैसर्गिक भावना आहे. 'मी हो तुमची नार, सोडूनी आंबाडा, धनी दूर कावं जाता, रात काळी, भूलावण, घनगर्द पावसात, वय निघुनी गेले, लय उतावीळ उन्हं' इत्यादी यात काही लावण्याही आहेत. कवीने निसर्गाच्या प्रतिमांच्या माध्यमातून स्त्री देहाचे शृंगारीक वर्णन केले आहे. 'मी हो तुमची नार' मधील सखी आपल्या सख्याला म्हणते,

**"आता टाका खोलीमंधी बाज**
**लावून घ्या दार**
**घ्या हातामधी हात**

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur. Tal. Tuljapur. Dist. Osmanabad

नका करु घात
वाजले रातचे बारा
झोपला गाव सारा
टाका विहीरीत हळूच खडा
अन् उडवा पाण्याचे तरंग"

अशाप्रकारे मुलगी वयात आल्यापासून तिला मुल होईपर्यंतचे तिचे शृंगारीक वर्णन कवीने अनेक लावण्यामधून केले आहे.

'धनी' या काव्यसंग्रहातील अनेक कवितांमधून कवी स्त्री दु:खाचे, कष्टाचे वर्णन करुन अनेकांना आत्मचिंतन करण्यास प्रवृत्त करतो. तर दुसरीकडे लावण्यांच्या माध्यमातून स्त्रीदेहाचे वर्णन करुन काही वेळा वाचकांचे मनोरंजनही करताना दिसतो.

या बरोबरच कवी डॉ. भारत हंडीबाग हे ज्या परिसरात लहानाचे मोठे झाले तो परिसर म्हणजे त्याचे गाव, गावचे शिवार याचेही अतिशय सुंदर असे वर्णन 'माझ्या गावच्या शिवाराची' या कवितेत केले आहे. तसेच 'नाव नसलेली माझी कविता' यामधून सुद्धा कवी निसर्ग, नदी, नाले, शेत, शेतकरी, कामकरी स्त्रीया, गाय, वासरु, गाव, मंदिर, भजन, किर्तन, गौळणी, शृंगार, शिक्षण, म्हाताऱ्यांचा आधार, संत, महंत, नेते, पुढारी, समाजसेवक, या सगळ्यांना पुरुन उरणारी आहे. जिथे-जिथे ज्याला-ज्याला अडचण येईल तिथे-तिथे माझी कविता मदतीसाठी दाता म्हणून हजर होते, मदत करते. अशी माझी कविता सगळ्यांना पुरुन उरते. यातून कवीचा उदारमतवाद दिसून येतो. माणूसकी, दया, प्रेम, आपुलकीची भावना दिसून येते.

कवी भारत हंडीबाग यांनी याबरोबर गावगाड्यात चालणाऱ्या अनेक प्रसंगाला स्पर्श करण्याचा प्रयत्न 'धनी' या काव्य संग्रहातील कवितेच्या माध्यमातून केला आहे. कारण त्यांचा पिंडच ग्रामीण जीवनातून पोसला असून त्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने तो अनुभवलेला आहे. म्हणूनच त्यांना ग्रामीण जीवनशैलीचे आकर्षण आहे. 'धनी' या संग्रहातील कविता या अस्सल मराठवाडी ग्रामीण बोली भाषेतील आहेत. यात शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, निसर्ग, पाऊस, झोपडी, जमीन, पिकपाणी, इत्यादींच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनशैलीचे, त्याच्या भाव-भावनांचे, सुख-दु:खाचे आपल्या



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.